# प्रेसनोट

नाशिक,
दि. १८/०९/२०२३

**ज्ञानेश्वर पंढरीनाथ विसपुते, उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग, चाळीसगांव ता. चाळीसगांव जि. जळगांव यांनी ४,००,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | मुबंईनाका पो.स्टे. नाशिक शहर गुरनं ३७५ /२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | ज्ञानेश्वर पंढरीनाथ विसपुते, उप विभागीय अभियंता, जिल्हा परीषद बांधकाम उप विभाग, चाळीसगांव ता. चाळीसगांव जि. जळगांव |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,००,०००/- रुपये ( तडजोडअंती ) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,००,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील आलोसे ज्ञानेश्वर विसपुते यांनी त्यांच्या उप विभागीय अभियंता जिल्हा परीषद बांधकाम उप विभाग चाळीसगांव या पदाच्या कार्यकाळात ''डॉक्टर शामा प्रसाद मुखर्जी रुरबन'' या शासकिय योजने अंतर्गत पातोंडा ता. चाळीसगांव जि. जळगांव येथे समुह परिसरात क्लस्टर विकसीत करण्याचे कामांचे परिवेक्षण करून पुर्णत्वाचा दाखला देवुन बिलाची रक्कम ४ कोटी ८२ लाख रूपये तक्रारदार यांना मिळाली म्हणुन त्याचे मोबदल्यात बक्षीस म्हणुन तसेच तक्रारदार यांची जमा असलेली ३५ लाख रूपये अनामत रक्कम तक्रारदार यांना परत मिळवुन देण्यासाठी पुर्णत्वाचा दाखला देणेकरीता तक्रारदार यांचेकडे एकुण बिलाचे १ टक्के म्हणुन ५,००,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे **ज्ञानेश्वर पंढरीनाथ विसपुते, उप विभागीय अभियंता, जिल्हा परीषद बांधकाम उप विभाग, चाळीसगांव ता. चाळीसगांव जि. जळगांव** यांनी तक्रारदार यांचे कडे ५,००,०००/- रुपयाची लाचेची मागणी करून तडजोडअंती ४,००,०००/- रूपयांची लाचेची मागणी करून सदरची लाचेची रक्कम दि. १६/०९/२०२३ रोजी नाशिक शहरातील गडकरी चौकातील एल.आय.सी.कार्यालयाचे समोर असलेल्या सार्वजनिक रोडवर, तक्रारदार यांचे महिद्रा एक्स यु व्ही ७०० वाहन क्रमांक एम.एच.१५, जे.ए. १२२७ या वाहनात **स्विकारल्याने** त्यांना पकडण्यात आले असुन त्यांचेविरुध्द मुबंईनाका पो.स्टे. नाशिक शहर गुरनं ३७५ /२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००

**(नरेंद्र भा. पवार)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबधक विभाग, नाशिक**